सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित

## विविध वृत्त.....

# सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जुलै : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत श्री देशिकेंद्र विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते .

दि. २१ जुलै रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत सत्र पार पडले . या सत्रामध्ये इयत्ता ८ वी ते १० वी मधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले असून सायबर वॉरिअर नरेश पंडित आणि सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंग म्हणजे काय, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात, -ख चा सुरक्षित व जबाबदारीने वापर, मजबूत (डीपस) पासवर्ड कसा तयार करावा याची उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या (झशीळीीळेपी) द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, जढझ फसवणूक आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याविषयीही महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दानाई यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी विद्यार्थांसह शिक्षक वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होता .

या सत्राला क्विक हिल फाऊंडेशनचे फील्ड इन्स्पेक्टर अरविंद यांनी भेट देऊन सत्राचे निरीक्षण केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले.